# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे ४११००४

## ।। प्रकटन ।।

**विषय**–फेब्रुवारी–मार्च २०२३ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन सादर करावयाच्या नियमित शुल्कास मुदतवाढ व विलंब शुल्काच्या **तारखांबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की,महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या फेब्रुवारी–मार्च २०२३परीक्षेस प्रविष्ठ होवू इच्छिणा–या नियमित, व्यवसाय अभ्यासक्रम घेणारे विद्यार्थी, सर्व शाखांचे पुनर्परीक्षार्थी, नाव नोंदणी प्रमाणपत्र**(Enrollment Certificate)**प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी**(Private Candidate),** तसेच श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय, **ITI**(औद्योगिक प्रशिक्षण संस्थेव्दारे**Transfer of Credit**घेणारे विद्यार्थी)चे विषय घेवून परीक्षेस प्रविष्ठ होवू इच्छिणा–या विद्यार्थ्यांची परीक्षा आवेदनपत्रे त्यांचे कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांमार्फत ऑनलाईन पध्दतीने <u>www.mahahsscboard.in</u>या संकेतस्थळावर भरावयाची मुदत <u>दिनांक ०५.११.२०२२</u> रोजी संपत असून त्यांच्या नियमित शुल्काने मुदतवाढीच्या तारखा व विलंब शुल्काने भरावयाच्या तारखांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| शुल्क प्रकार | उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामार्फत **शास्त्र, कला व वाणिज्य शाखांची नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे SARAL Databaseवरुन ऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या तारखा तसेच** व्यवसाय अभ्यासक्रम HSC vocationalStreamशाखांचे नियमित विद्यार्थी, सर्व शाखांचे पुनर्परीक्षार्थी, नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी, श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय, ITI(औद्योगिक प्रशिक्षण संस्थेव्दारे Transfer of Creditघेणारे विद्यार्थी) विद्यार्थ्यांची <u>नियमित</u> शुल्काने आवेदनपत्रे भरावयाच्या **मुदतवाढीच्या** तारखा व विलंब शुल्काने भरावयाच्या तारखांचा तपशील खालीलप्रमाणे | **उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी चलन काढून शुल्क बॅंकेत भरावयाची मुदत** |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| नियमित शुल्क | रविवार दि.०६.११.२०२२<br>ते<br>मंगळवार दि.१५.११.२०२२ | शुक्रवार दि.०२.१२.२०२२ पर्यत |
| विलंब शुल्क | बुधवार दि. १६.११.२०२२<br>ते<br>बुधवार दि. ३०.११.२०२२ (सायंकाळी ५.०० वाजेपर्यत) | |

अ) उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी परीक्षा शुल्क RTGSद्वारे भरणा केल्याच्या **RTGS/NEFT** पावती/ चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या व प्रिलिस्ट जमा करावयाची तारीख बुधवार , <u>दि.०७/१२/२०२२</u>

ब) सर्व विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरुन सबमीट केल्यानंतर आवेदनपत्रे भरावयाच्या कालावधीमध्ये उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना कॉलेज Loginमधून Pre-listउपलब्ध करुन दिलेली असेल, कनिष्ठ महाविद्यालयांनी त्याची प्रिंट काढून आवेदनपत्रात नमूद केलेली सर्व माहिती जनरल रजिस्टरनुसार पडताळणी करून अचूक असल्याची खात्री करावी.सदर प्रिलिस्टवर माहितीची खात्री केल्याबाबत संबंधीत विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घ्यावी. त्यानंतर सदर प्रिलिस्ट परीक्षा फी चलन व विद्यार्थी यादीसोबत विभागीय मंडळाकडे जमा करावी.

इ.१२वी परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे त्यांच्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामार्फत भरावी. सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य यांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी खालील महत्वाच्या बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

१– खालील तपशीलाप्रमाणे विभागीय मंडळातील उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी परीक्षा शुल्क खाली नमूद केलेल्या बॅकेमध्ये मध्ये **RTGS/NEFT** द्वारे भरणा करुन चलनाची प्रत तसेच विद्यार्थ्यांच्या याद्या व प्रिलिस्ट दिलेल्या मुदतीतच विभागीय मंडळाकडे सादर कराव्यात.

१. पुणे, औरंगाबाद व कोल्हापूर :— Bank of India Virtual Account
२. मुंबई, नागपूर व लातूर :— HDFC Bank Virtual Account
३. अमरावती, नाशिक व कोकण :— AXIS Bank Virtual Account

२–आवेदनपत्रे सादर केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क संगणकीय चलन **Download**करुन चलनावरील **Virtual Account** मध्ये **NEFT/RTGS**व्दारे भरावयाचे आहे. उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी **NEFT/RTGS**द्वारे भरणा केलेली रक्कम त्यांच्या बॅक खात्यातून प्रत्यक्ष वजा झाली आहे किंवा नाही तसेच **Account Number** व **IFSc Code** चुकीचा नमूद केला गेल्यास सदरची रक्कम परत त्यांच्या खात्यात जमा झाली नसल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी संबंधित मुख्याध्यापक/प्राचार्य यांची राहील.

३– उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी सादर केलेल्या सर्व आवेदनपत्रांचे विहित परीक्षा शुल्क भरल्याशिवाय संबंधितांचे प्रवेशपत्रे उपलब्ध करुन दिली जाणार नाहीत याची नोंद सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांच्या प्रमुखांनी घ्यावी.

४– उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी उपरोक्तप्रमाणे परिपूर्ण व अचूक शुल्क भरल्याची खातरजमा विभागीय मंडळस्तरावर करुन त्याबाबतचा अहवाल गणकयंत्र विभागाच्या नमून्यात राज्यमंडळ कार्यालयास सादर केल्यानंतर संबंधित उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध करुन देण्यात येतील.

५– विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे SARAL Database वरुन Save होत नसल्यास त्यांनी उपरोक्त दिलेल्या मुदतीत All Application च्या लिंकवरून आवेदनत्रे भरावयाची आहेत.

६– नियमित तसेच विलंब शुल्क स्वतंत्र **RTGS/NEFT** द्वारे भरण्यात यावे.

७–नियमित शुल्काने तसेच विलंब शुल्काने आवेदनपत्रे भरावयाच्या तारखांमध्ये कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

८– अतिविलंब शुल्काने आवेदनपत्रे भरण्याच्या तारखां यथावकाश कळविण्यात येतील.

दिनांक:— ०३ /११/२०२२

(अनुराधा ओक)
सचिव
राज्य मंडळ, पुणे ०४.